रे.दि.मु.नं.१६८/२०१२

पार्वती बाजीराव पवार उर्फ ठाकर .... **वादी**

**वि.**

उमेश सुर्याजी तुपे वगैरे ... **प्रतिवादी**

## निशाणी ५ वरील आदेश
(घोषित दि १०/०७/२०१४)

१. मौजे पाली, तालुका कराड, जिल्हा सातारा येथील शेतजमीन मिळकत भुमापन क्र. १५९६ जुना भुमापन क्र. ३०६७ क्षेत्र ७४ आर या मिळकतीतील वादी यांच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करू नये म्हणुन दाव्याच्या अंतिम निकालापावेतो प्रतिवादी क्र. १ ते ३ अगर तर्फे इसम यांना तुर्तातुर्त मनाई व्हावी याकरता वादी यांनी हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ३९ नियम १ प्रमाणे दाखल केलेला आहे. सदरच्या मिळकतीस यापुढे सोयीकरीता **"दावा मिळकत"** असे संक्षिप्तात संबोधण्यात आलेले आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, दावा मिळकत त्यांचे मालकी कब्जेवहिवाटीची आहे. सदरच्या मिळकतीचा मुळ सर्व्हे ७५०/६ असा होता. सर्व्हे ७५०/६ याचे मुळ मालक अंतू भाऊ खंडाईत, बापू भाऊ खंडाईत व पिरा भाऊ खंडाईत असे होते. बापू भाऊ खंडाईत व अंतू भाऊ खंडाईत यांनी सर्व्हे नं. ७५०/६ मधील त्यांचा २/३ हिस्सा व इतर मिळकतीतील त्यांचा २/३ हिस्सा श्री. गोविंद बाळा तुपे यांच्याकडून कर्जावू घेतलेल्या रक्कम रू. १५००/– याकरिता दि. ०९/०३/१९३४ रोजी तारण गहाण दिलेला होता. पण दावा मिळकतीचा कब्जा अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांच्याकडेच होता.

३. त्यानंतर सन १९३७ मध्ये सर्व्हे क्र. ७५०/६ चे फाळणी बारा होवून सर्व्हे क्र. ७५०/६अ व सर्व्हे क्र. ७५०/६ब असे दोन वसले पडले. सर्व्हे क्र. ७५०/६अ या मिळकतीस पिरा भाऊ खंडाईत यांचे नाव नोंद झाले व सर्व्हे क्र. ७५०/६ब या मिळकतीस प्रत्येकी ८ आणे हिश्यास अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांची नावे नोंद झाली.

४. अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांनी गोविंद बाळा तुपे यांच्या कर्जाऊ रक्कमेची मुदतीत परतफेड केली नाही त्यामुळे गोविंद बाळा तुपे यांनी कराड दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात सि.सि.नं. ७०९३/१९४७ चा दावा कर्ज वसुलीकरीता दाखल केला होता. सदर दाव्यात झालेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता गोविंद बाळा तुपे यांनी कराड येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात बोर्ड दरखास्त क्र. ३९/१९५६ ची दरखास्त दाखल केली होती. सदर दरखास्तीमध्ये अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांनी गोविंद बाळा

तुपे यांना तारण गहाण दिलेल्या मिळकतीचा जाहीर लिलाव काढण्यात आला होता. परंतू अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांनी अॅवॉर्डची रक्कम रू. १५०५/— आणे १४ पैसे ६ पैकी रूपये ११००/— ता. २५/११/१९६२ रोजी तर उरलेली रक्कम रूपये ४०५/— आणे १४ पैसे ६ तारीख ०१/१२/१९६२ रोजी गोविंद बाळा तुपे यांना रोख दिले. त्याप्रमाणे धनको गोविंद बाळा तुपे यांनी सदरची रक्कम मिळाल्याबाबत व व्याजात सुट दिलेबाबत पावती अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांना लिहुन दिलेली होती. गोविंद बाळा तुपे यांनी तारण मिळकतींचा लिलाव करण्याचा नाही असा लेखी जबाब त्या दरखास्तीचे कामी दिला होता. त्यामुळे ती दरखास्त निकाली काढण्यात आली.

५. वादी यांचे असे कथन आहे की, सदरची सर्व्हे क्र. ७५०/६ब ही मिळकत गहाणमुक्त होवून देखील सर्व्हे क्र. ७५०/६ब च्या महसुल दप्तरी गोविंद बाळा तुपे यांच्या नावाची पोकळ नोंद राहिली. वादी यांनी ता. ०१/०४/१९६८ रोजी रक्कम रू. १०००/— यास सर्व्हे क्र. ७५०/६ब बापू भाऊ खंडाईत व अंतु भाऊ खंडाईत यांच्याकडुन खुषखरेदी घेतले व तेव्हापासुन दावा मिळकतीत म्हणजेच सर्व्हे क्र. ७५०/६ब या मिळकतीत मालकी हक्काने कब्जेवहिवाटीत आहेत. त्यानुसार वादी यांच्या नावाची नोंद फेरफार क्र. ९४३७ ने महसुल दप्तरी झालेली आहे.

६. वादी यांचे असे कथन आहे की, मौजे पाली येथे गट एकत्रीकरण योजना अंमलात आली तेव्हा सर्व्हे क्र. ७५०/६ब या मिळकतीस गट क्र. ३०६७ असा देण्यात आला. वादी यांचे नाव मालक म्हणून एकत्रीकरण योजनेमध्ये नोंद करण्यात आले. असे असताना प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी फेरफार क्र. ३७६२ याबाबत तहसिलदार कराड यांचेकडे तक्रार रजि. क्र. १/२००७ चा अर्ज केला होता. त्यामध्ये मंडल अधिकारी यांनी चुकीचा निष्कर्ष काढून फेरफार क्र. ३७६२ रद्द केला व दावा मिळकतीच्या महसुल दप्तरी प्रतिवादी क्र. १ उमेश सुर्याजी तुपे यांचे नाव ए.कु.मॅ. म्हणुन नोंद केले. या नोंदीच्या आधारे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी बेकायदेशीररित्या दावा मिळकत प्रतिवादी क्र. ४ एच.डी.एफ.सी. बॅंक यांना तारण देवून रक्कम रू. २,९०,०००/— कर्ज काढलेले आहे. अशा परिस्थितीत दि. १०/०७/२०१० रोजी प्रतिवादी यांनी वादी यांचे दावा मिळकतीतील मालकी हक्क नाकारला व धमकीची भाषा बोलून दाखविली त्यामुळे वादी यांना हा दावा व हा अर्ज दाखल केलेला आहे.

७. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नि. क्र. ३१ येथे या अर्जास म्हणणे दिलेले आहे. प्रतिवादी यांनी अशी हरकत घेतलेली आहे की, त्यांच्या तीन सख्या बहिणींना याकामी पक्षकार करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे आवश्यक पक्षकारांअभावी हा दावा बाधित आहे. अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांनी गोविंद बाळा तुपे यांना दावा मिळकत तारण गहाण दिली होती.

याव्यतिरिक्त बाकी सर्व अर्जातील कथन प्रतिवादी यांनी स्पष्ट शब्दात नाकारले आहे. प्रतिवादी यांनी वादी यांचा दावा मिळकतीतील मालकीहक्क व कब्जेवहिवाट देखील स्पष्ट शब्दात नाकारली आहे.

८. प्रतिवादी यांनी अशी तक्रार उपस्थित केलेली आहे की, अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांनी गोविंद बाळा तुपे यांना तारण गहाणाची कर्जावू रक्कम भरपाई करून कधीही दिलेली नव्हती व नाही. दावा मिळकत ही गोविंद बाळा तुपे यांचेच कब्जेवहिवाटीत होती. एकत्रीकरण योजनेचे वेळेस एकत्रीकरण अधिका—यांनी गोंविद बाळा तुपे यांची नोंद इतर हक्कात कुळ म्हणुन केलेली आहे. सदरच्या नोंदीविरूध्द वादी यांनी कधीही तक्रार केलेली नाही. एकत्रीकरण योजनेत वादी यांचे मालक म्हणून नाव महसूल दप्तरी चुकीचे नमुद करण्यात आलेले आहे. सदरची चौकशी एकतर्फा करण्यात आलेली आहे. प्रतिवादींनी जो तक्रार अर्ज तहसिलदार कराड यांचेकडे केला होता त्याप्रमाणे तक्रार रजि. क्र. ०१/२००७ च्या निर्णयानुसार झालेली नोंद ही बरोबर आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीचे मालक व वहिवाटदार असल्यामुळे त्यांनी ही मिळकत एच.डी.एफ.सी. बॅकेस तारण दिलेली आहे व कर्ज घेतलेले आहे. प्रतिवादी हे दावा मिळकतीत ऊस व जिरायत पिके सालोसाल करीत आहेत. या सर्व सबबीवर प्रतिवादी यांनी हा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

९. वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. व्ही. कोडुले यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. डी. पाटील यांना पुरेशी संधी देवुन देखील त्यांनी युक्तीवाद केला नाही. सदरची अर्ज ब—याच काळ नि. क्र. ५ चे युक्तीवादावर प्रलंबित असल्यामुळे प्रतिवादींचे युक्तीवादाशिवाय सदरचा अर्ज निकाला करीता घेण्यात आला.

१०. दोन्ही पक्षकारांच्या प्रतिकथनावरून, उपलब्ध पुराव्यावरून व सन्माननीय विधीज्ञांच्या युक्तीवादावरून खालीलप्रमाणे मुद्दे माझ्या समोर निष्कर्षाकरीता उपस्थित होतात.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादी यांना दाव्यामध्ये सकृतदर्शनी परिस्थिती आहे का? | ... | **होकारार्थी** |
| २. | न्यायाचे समतुलत्व वादी यांच्या बाजुने आहे का? | ... | **होकारार्थी** |
| ३. | प्रतिवादी क्र. १ते ३ यांना तुर्तातूर्त मनाई आदेश न केलेस वादी यांचे अपरिमीत नुकसान होणार आहे का? | ... | **होकारार्थी** |
| ४. | अतिम आदेश काय? | ... | **अंतिम आदेशाप्रमाणे अर्ज मंजूर करण्यात येत आहे.** |

// **का र ण मिं मा सा** //

**मुद्दा क. १ ते ३ बाबत :—**

११. वादीतर्फे विधीज्ञ यांनी आपल्या युक्तीवादात दाव्यात हजर केलेल्या विविध कागदपत्रांच्या आधारे असा युक्तीवाद केला की, दावा मिळकतीचा मुळ सर्व्हे क्र. ७५०/६ असा होता. त्यांनी या मिळकती मुळच्या खंडाईत बंधुच्या मालकीच्या होत्या हे देखील युक्तीवादात नमुद केले. अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांनी सर्व्हे क्र. ७५०/६ मधील व इतर मिळकतीतील त्यांचा २/३ हिस्सा गोविंद बाळा तुपे यांना दिनांक ०९/०३/१९३४ रोजी तारण दिला होता. पण त्यावेळेस अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांनी दावा मिळकतीची कब्जा गोविंद बाळा तुपे यांना दिलेला नव्हता. तसेच तारण गहाण रक्कम बोर्ड दरखास्त क्र. ३९/१९५६ यामध्ये अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांनी गोविंद बाळा तुपे यांना दिली होती व त्याप्रमाणे ती दरखास्त निकाली निघाली होती. पण गोविंद बाळा तुपे यांच्या नावाची पोकळ नोंद महसुल दप्तरी तशीच राहुन गेली. त्यामुळे त्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी मंडल अधिकारी यांनी केलेल्या बेकायदेशीर आदेशाच्या आधारे त्यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या सातबारा पत्रकी करून घेतली. सातबारा पत्रकी नोंदी या केवळ महसूल कारणाकरीता असतात व त्याआधारे मालकी सिद्ध होत नाही असा युक्तीवाद देखील वादीतर्फे विधीज्ञ यांनी केला. दावा मिळकत वादी यांच्या मालकी कब्जेवहिवाटीची आहे व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे कधीही कब्जेवहिवाट नव्हती व नाही. या सर्व सबबीवर त्यांनी हा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

१२. दावा मिळकत ही मुळची बापू भाऊ खंडाईत व अंतू भाऊ खंडाईत यांच्या मालकी वहिवाटीची होती ही बाब वादांकीत नाही. तसेच दावा मिळकतीचा पुर्वी सर्व्हे क्र. ७५०/६ होता हे दर्शविण्याकरिता वादी यांनी याकामी फेरफार क्र. २७५८ हा नि. २३/७ ला हजर केलेला आहे. या फेरफारावरुन स्पष्ट होते की, दि. २०/०८/१९३८ रोजी सर्व्हे क्र. ७५०/६ याचे सर्व्हे क्र. ७५०/६अ व सर्व्हे क्र. ७५०/६ब असे दोन वसले करण्यात आले होते. सर्व्हे क्र. ७५०/६अ यास पिरा भाऊ खंडाईत यांचे नांव लावण्यात आले तसेच सर्व्हे क्र. ७५०/६ब यांस अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांचे नांव प्रत्येकी ८ आणे हिश्याने लावण्यात आले. ही बाब फेरफार क्र. २७५८ ने स्पष्ट होते. वादी यांनी याकामी नि. ३/६ ला दि. ०९/०३/१९३४ रोजीच्या तारण गहाण दस्ताची खरी नक्कल हजर केलेली आहे. या दस्तावरुन स्पष्ट होते की, बापू भाऊ खंडाईत व अंतू भाऊ खंडाईत यांनी सर्व्हे क्र. ७५०/६ व इतर मिळकतीतील त्यांचा २/३ हिस्सा गोविंद बाळा तुपे यांना तारण गहाण दिलेला होता. या दस्तामध्ये स्पष्टपणे असे लिहिलेले आहे की, तारण गहाण दिलेल्या मिळकतींचा कब्जा बापू भाऊ खंडाईत व अंतू भाऊ खंडाईत यांनी

त्यांच्याकडेच ठेवलेला आहे. या दस्तामध्ये असेही नमुद केलेले आहे की, अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांनी कर्जाऊ घेतलेली रक्कम रु. १५००/— पुढील दहा वर्षात व्याजासह लिहून घेणार गोविंद बाळा तुपे यांना देणेची आहे व त्यांनी तसे न केल्यास गोविंद बाळा तुपे यांना कोर्टामार्फत तारण गहाण ठेवलेल्या मिळकतीची विक्री करुन रक्कम वसूल करण्याचा अधिकार राहील. या तारणा गहाण दस्तातील मजकूरावरुन स्पष्ट होते की, हस्तांतर कायदा कलम ५८ (ब) प्रमाणे सदरचा तारण गहाण दस्त हा साध्या पद्धतीचा (simple mortgage) गहाण दस्त आहे.

१३. वादी यांनी याकामी नि. ३/५ ला बोर्ड दरखास्त क्र. ३९/१९५६ या दरखास्तीच्या कागदपत्रावरुन स्पष्ट होते की, गोविंद बाळा तुपे यांनी सि. स. क्र. ७०९३/४७ व सि. स. ७०५४/४७ या दाव्यांच्या अवॉर्डच्या आधारे सदरची दरखास्त रक्कम वसुलीकरिता म्हणून कासाबाई पिराजी खंडाईत, बापू भाऊ खंडाईत व अंतू भाऊ खंडाईत यांच्याविरुद्ध रक्कम रु. १५०५/— आणे १४ पैसे ६ वसुली करिता म्हणून दाखल केलेली होती. सदरच्या दरखास्तीमध्ये नि. १ च्या मागे दरखास्तीमधील रक्कम पुर्ण वसूल झाल्यामुळे दि. २५/०१/१९६३ रोजी निकाली करण्याचा आदेश केलेला आहे. वादी यांनी नि. ३/२ ला गोविंद बाळा तुपे यांनी दि. २६/११/१९६२ रोजी लिहून दिलेली पावती हजर केलेली आहे. या पावतीवरुन स्पष्ट होते की, बोर्ड दरखास्त क्र. ३९/१९५६ यातील देणे रक्कम रु. १५०५/— आणे १४, ६ पैसे यापैकी रक्कम रु. ११००/— बापू भाऊ खंडाईत व अंतू भाऊ खंडाईत यांनी गोविंद बाळा तुपे यांना दिलेली आहे व त्यामुळेच ही पोोहच पावती गोविंद बाळा तुपे यांनी बापू व अंतू यांना लिहून दिलेली आहे. वादी यांनी नि. ३/३ ला दि. ०१/१२/१९६२ रोजी गोविंद बाळा तुपे यांना बोर्ड दरखास्त क्र. ३९/१९५६ यामधील येणेबाकी असलेल्या रक्कमे पैकी रु. ४०५/— आणे १४, पैसे ६ बापू भाऊ खंडाईत व अंतू भाऊ खंडाईत यांच्याकडून मिळालेबाबत गोविंद बाळा तुपे यांनी लिहून दिलेली पोहच पावती हजर केलेली आहे. या दोन्ही पावत्यावरुन स्पष्ट होते की, अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांनी बोर्ड दरखास्त क्र. ३९/१९५६ यामधील येणेबाकी रक्कम रु. १५०५/— १४ आणे, ६ पैसे गोविंद बाळा तुपे यांना दिलेली आहे. त्यामुळेच बोर्ड दरखास्त क्र. ३९/१९५६ च्या नि. १ वर नमूद केल्याप्रमाणे दि. २५/०१/१९६३ पुर्ण फेडीने निकाली केल्याचा आदेश केलेला आहे. या कागदपत्रावरुन सकृतदर्शनी असे दिसून येते की, कर्जाची रक्कम रु. १५००/— व्याजासह बापू भाऊ खंडाईत व अंतू भाऊ खंडाईत यांनी दि. ०९/०३/१९३४ रोजीच्या तारण गहाण खतामध्ये नमूद असलेली कर्जाऊ रक्कम फेड केलेली आहे.

१४. वादी यांनी नि. ७ येथे फेरफार क्र. ८६१६ हजर केलेला आहे. हा फेरफार दि. १७/०६/१९६३ रोजी मंजूर झालेला आहे. या फेरफारावरुन हे स्पष्ट होते की, दि.

२४/०२/१९६३ रोजी बापू भाऊ खंडाईत, अंतू भाऊ खंडाईत व कासाबाई पिराजी खंडाईत यांनी दि. २५/११/१९६२ व दि. ०१/१२/१९६२ रोजीच्या रक्कम भरपाईच्या पावत्या हजर केल्यावरुन गोविंद बाळा तुपे यांचे नांव तारण दिलेल्या सर्व्हे क्र. ७३४/३, ७४४/७, ७१३/३, ७१०/७अ, ७१०/१, ७०८/१ब,२ब व ७०८/१अ,२अ,३अ या जमिनीच्या महसूल दप्तराच्या नोंदीतून कमी करण्यात आलेले आहे. या फेरफारावरुन असे दिसून येते की, त्यावेळेस सर्व्हे क्र. ७५०/६ ही जी तारण दिलेली मिळकत होती त्या मिळकतीच्या महसूल दप्तरातून गोविंद बाळा तुपे यांचे नांव कमी करायचे राहून गेलेले होते. यावरुन सकृत दर्शनी असे दिसून येते की, वादी यांच्या कथनात तथ्य आहे की, गोविंद बाळा तुपे यांचे नांवाची पोकळ नोंद दावा मिळकतीच्या महसूल दप्तरी इतर हक्कात राहिलेली होती.

१५. याकामी वादी यांनी नि. ३/७ ला दि. ०१/०४/१९६८ रोजीच्या खरेदीपत्राची प्रत हजर केलेली आहे. या दस्तावरुन स्पष्ट होते की, अंतू भाऊ खंडाईत व बापू भाऊ खंडाईत यांनी सर्व्हे क्र. ७५०/६ब म्हणजेच दावा मिळकत वादी यांना रक्कम रु. १०००/– ला विक्री केलेली आहे. या दस्तावरुन हे देखील स्पष्ट होते की, दावा मिळकत वादी यांच्या ताब्यात कूळ म्हणून होती तोच कब्जा मालक म्हणून या दस्ताच्या आधारे कायम करण्यात आलेला आहे.

१६. वादी यांनी नि. २३/६ ला फेरफार क्र. ९४३७ हजर केलेला आहे. या फेरफारावरुन स्पष्ट होते की, दि. ०१/०४/१९६८ रोजीच्या खरेदीपत्राच्या आधारे वादी यांचे नांव दावा मिळकतीच्या सातबारा पत्रकी मालकी सदरी लागलेले आहे. वादी यांनी नि. १० येथे दावा मिळकतीचा सन १९७४–७५ ते सन १९९०–९१ चा सातबारा उतारा हजर केलेला आहे. या सातबारा उता–यास सन १९७६–७७ ते सन १९७९–८० या दरम्यान पीक पाहणी सदरी वादी पार्वतीबाई बाजीराव पवार यांच्या नावाची नोंद आहे व इतर सर्व वर्षात गोविंद बाळा तुपे यांच्या नावाची नोंद आहे. वादी यांनी नि. ३/१ ला हजर केलेल्या मृत्यु नोंद उता–यावरुन स्पष्ट होते की, गोंविद बाळा तुपे यांचा मुत्यृ दि. २५/०३/१९६७ ला झालेला आहे. त्यामुळे नि. १० च्या सातबारा उता–या सन १९७४–७५ ते सन १९९०–९१ या कालावधीतील वर नमूद केल्याप्रमाणे मधले काही वर्ष सोडून गोविंद बाळा तुपे यांच्या नावाची नोंद जी पीक पाहणी सदरी झालेली आहे ती चुकीची आहे हे सकृतदर्शनी स्पष्ट होते. त्यामुळे वादीतर्फे विधिज्ञ यांच्या याबाबतच्या युक्तीवादात तथ्य आहे असे वाटते.

१७. वादी यांनी नि. १२ येथे एकत्रीकरणाचा उतारा हजर केलेला आहे. या उता–यास दावा मिळकतीचे मालक म्हणून वादी यांचे नांव नमूद आहे. या उता–यावरुन देखील स्पष्ट होते की, वादी हेच मालक व कब्जेदार असल्यामुळे तिचे नांव एकत्रीकरण उता–यात नमूद झालेले आहे.

याकामी वादी यांनी नि. २३/२ ला जो दावा मिळकतीचा सातबारा उतारा हजर केलेला आहे. त्यामध्ये सन १९३८—३९ ते सन १९४९—५० या दरम्यानच्या कालावधीच्या पीक पाहणी सदरी बापू भाऊ खंडाईत व अंतू भाऊ खंडाईत यांचेच नांव नमूद आहे. तसेच नि. २३/३ ला जो वादी यांनी सन १९५०—५१ ते सन १९६६—६७ चा सातबारा उतारा हजर केलेला आहे त्यात पीक पाहणी सदरी बापू भाऊ खंडाईत व अंतू भाऊ खंडाईत यांचे नांव नमूद आहे. या दोन्हीही सातबारा उता—यास इतर हक्कात गोविंद बाळा तुपे यांचे नांव तारण गहाण घेणार म्हणून नमूद आहे. जर खरोखरच बापू भाऊ खंडाईत व अंतू भाऊ खंडाईत यांनी दावा मिळकतीचा कब्जा तारण गहाण खता बरोबर गोविंद बाळा तुपे यांना दिला असता तर त्यांच्या नावाची नोंद पीक पाहणी सदरी सन १९३५—३६ पासून सन १९६१—६२ पर्यंत दिसली असती पण तशी नोंद दिसून येत नाही. याकामी वादी यांनी नि. २३/४ ला सन १९६७—६८ ते सन १९७३—७४ पर्यंतचा दावा मिळकतीचा सातबारा उतारा हजर केलेला आहे. या सातबारा उता—यास मालकी कोष्टकी व पीक पाहणी सदरी वादी यांचेच नांव नमूद आहे. पण वर नमूद केल्याप्रमाणे नि. १० च्या सन १९७४—७५ ते सन १९९०—९१ च्या सातबारा उता—यास गोविंद बाळा तुपे यांचे नांव सन १९७४—७५, सन १९७५—७६, सन १९८०—८१ ते सन १९९०—९१ च्या पीक पाहणी सदरी नमूद आहे. वादी यांचे नांव सन १९७४—७५ ते सन १९९०—९१ च्या सातबारा उता—यास कोणत्या आधारे कमी झालेले आहे हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे महसूल नोंदीमध्ये सकृतदर्शनी चूका आहेत हे स्पष्ट होते. त्यामुळे वादीतर्फे विधिज्ञ यांनी या चुकांबाबत जो युक्तीवाद केला त्यात तथ्य आहे असे वाटते.

१८. वादीतर्फे विधिज्ञ यांनी याबाबत ***सोनाबाई रामचंद्र खोत वि. भिमराव कृष्णा खोत वगैरे, महा. लॉ. जरनल २०१२ (४) पान नं. ५४८*** या न्यायनिवाडयावर भिस्त ठेवलेली आहे. या न्यायनिवाडयात मे. उच्च न्यायालयाने असे अभिमत व्यक्त केलेले आहे की,

*महसूल दप्तरातील नोंदीना ग्रहतीकापुरते फक्त किंमत आहे व अशा या नोंदींमुळे कोणतेही हक्क किंवा मालकी याबाबत निष्कर्ष काढता येणार नाही. महसूल दप्तरातील नोंदीवरुन कब्जाबाबत निष्कर्ष काढता येईल पण मालकीचा निष्कर्ष काढता येणार नाही.*

१९. या न्यायनिवाडयातील जे अभिमत मे. उच्च न्यायालयाने व्यक्त केलेले आहे ते अभिमत कायद्यातील प्रचलीत तरतुदीनुसार सर्व मान्य झालेले आहे. त्यामुळे या न्यायनिवाडयातील अभिमतावरुन व कायद्यातील प्रचलीत तरतुदीनुसार हे स्पष्ट होते की, महसूल दप्तरातील नोंदवरुन प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची दावा मिळकतीत मालकी व कब्जा आहे असे सकृतदर्शनी निष्कर्ष

काढता येणार नाही. त्यामुळे वादीतर्फे विधिज्ञ यांच्या युक्तीवादात तथ्य आहे हे स्पष्ट होते.

२०. वादीतर्फे विधिज्ञ यांनी आपल्या युक्तीवादामध्ये असे भाष्य केले की, तुर्तातुर्त मनाईचा अर्ज याचा विचार करीत असताना दावा मिळकतीत दावा दाखल तारखेस कोणाचा कब्जा होता याबाबत विचार केला पाहिजे व हा कब्जा कायदेशीर होता किंवा बेकायदेशीर होता हे विचार करण्याची गरज नाही. या करिता वादीतर्फे विधिज्ञ यांनी ***बबन अनंतराव नाईक वि. प्रमिला उत्तमराव नाईक, ऑल एम. आर. २०११ (६) पान नं. १५*** न्यायनिवाडयांवर भिस्त ठेवली आहे. या न्यायनिवाडयात मे. उच्च न्यायालयाने असे अभिमत व्यक्त केलेले आहे की,

*दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ व कलम १५१ प्रमाणे असलेल्या तुर्तातुर्त मनाई अर्जाच्या कामात कब्जाबाबत वाद असेल तर कब्जाचा मुद्दा हाच फक्त विचारात घेतला पाहिजे व सदरचा कब्जा कायदेशीर होता किंवा बेकायदेशीर होता हा या अर्जाच्या चौकशीच्या कामाचा विषय होवू शकत नाही.*

२१. वर नमूद केलेल्या न्यायनिवाडयामध्ये वादी यांनी दावा दि. ०५/१२/२००८ रोजी प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. २ यांच्या हक्कात करुन दिलेले खरेदीपत्र बेकायदेशीर व रद्दबातल स्वरुपाचे आहे असे घोषीत होवून मिळण्याकरिता व कायम मनाईकरिता म्हणून दाखल केलेला होता. या न्यायनिवाडयात मे. उच्च न्यायालयाने ***रामेगौडा वि. वर्धाप्पा नायडू*** या न्यायनिवाडयातील मे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अभिमताचा विचार करुन वर नमूद केल्याप्रमाणे निष्कर्ष काढलेला आहे. त्यामुळे वर नमूद केलेल्या न्यायनिवाडयातील अभिमताचा विचार करिता व या खटल्यातील उपलब्ध सर्व कागदपत्रांचा विचार करिता सन २०११—१२ च्या दावा मिळकतीच्या सातबारा उता—यास जरी प्रतिवादी क्र. १ यांचे नांव एकत्र कुटूंब मॅनेजर म्हणून नमूद असले तरी त्या नोंदीच्या आधारे वर नमूद केलेल्या चर्चेवरुन प्रतिवादी क्र. १ ते ३ हे दावा मिळकतीच्या कब्जेत आहेत असा सकृतदर्शनी निष्कर्ष काढता येणार नाही.

२२. याकामी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. पण वादी यांनी जो कागदोपत्री पुरावा सादर केलेला आहे त्यावरुन दि. ०१/०४/१९६८ रोजीच्या खरेदीपत्राच्या तारखेपासून ते दावा मिळकतीच्या कब्जे वहिवाटीत मालकी हक्काने आहेत हे सकृतदर्शनी दिसून येते. तसेच वर चर्चीले प्रमाणे स्पष्ट होते की, वादी यांनी जी कागदपत्रे हजर केलेली आहेत त्यावरुन सकृतदर्शनी असे दिसून येते की, वादी यांचे पुर्व हक्कदार हे पुर्वीपासून दावा मिळकतीच्या कब्जेत होते. तसेच प्रतिवादी क्र. १ ते ३ व त्यांचे पुर्व हक्कदार गोंविंद बाळा तुपे व सुर्याजी गोविंद तुपे हे दावा मिळकतीच्या कब्जेत असलेबाबत उपलब्ध कागदोपत्री पुराव्यावरुन

सकृतदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे वादी यांनी जो हा दावा दावा मिळकतीची मालकी घोषीत होवून मिळण्याकरिता तसेच निरंतर मनाईकरिता दाखल केलेला आहे त्या करिता वादी यांना दाव्यामध्ये सकृतदर्शनी वादाबाबत युक्तिवाद करणेसारखी परिस्थिती असल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकतीत कब्जा असलेबाबत महसूल दप्तरातील नोंदी व्यतिरिक्त इतर कोणताही सकृतदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. नि. ५ वर दि. २४/०८/२०१० रोजी आदेश करुन पुढील आदेशापर्यंत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना तुर्तातुर्त मनाई आदेश करणेत आलेला आहे. पण प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी असा आदेश होवून देखील हा अर्ज चालविणेची तप्तरता दाखवलेली नाही जर खरोखर प्रतिवादी क्र. १ ते ३ हे दावा मिळकतीच्या कब्जेत असते तर त्यांनी या आदेशास विरोध केला असता व हा अर्ज तप्तरतेने चालविला असता. पण तसे घडलेले नाही. त्यामुळे न्यायाचे समतुलत्व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या बाजुने आहे असे दिसून येत नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या विरुद्ध तुर्तातुर्त मनाई आदेश न केलेस वादी यांचे दावा मिळकतीतील न्याय हक्कावरती प्रतिकूल परिणाम होवू शकतो व त्यांचे अपरिमीत नुकसान होवू शकते. याच कारणाकरिता सर्व मुद्दयांचा निष्कर्ष **होकारार्थी** दिलेला आहे.

**वादप्रश्न क्र. ४ करिता** :—

२३. या सर्व निष्कर्षामुळे अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. त्या अनुशंगाने खालील आदेश पारित करीत आहे.

—:: **आ दे श** ::—

**१.** तुर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्याविरुद्ध माझ्या पुर्वाधिका—यांनी दि. २४/०८/२०१० रोजी जो तुर्तातुर्त मनाई आदेश केलेला आहे तो आदेश कायम करुन दाव्याच्या अंतिम निकाला पावेतो प्रतिवादी क्र. १ ते ३ अगर तर्फे अन्य इसम यांनी वादी यांचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये अशी दाव्याच्या अंतिम निकालापावेतो त्यांना तुर्तातुर्त मनाई आदेश करण्यात येत आहे.

**३.** या अर्जाचा खर्च दाव्याचे मुळ खर्चात समाविष्ठ राहील.

(न्यायासनावर निवेदीत व अधिघोषीत केला)

**(दिनेश र. शेट्टी)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कराड

कराड
दिनांक :— १०/०७/२०१४

(गणेश धों. जाधव)
लघुलेखक (नि.श्रे.)